दैनिक साप्ताहिक आपल्या सर्वांचे लोकप्रिय वृत्तपत्र

# अक्षर वार्ता

संपादक – संजय आ.हंगे
मो.९७६६२६८४१५

DAINIK AKSHAR VARTA

कार्यकारी संपादक – सुमन डापकर
मो.८७८८२५१११४

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

बीड (महाराष्ट्र) वर्ष ४ थे, अंक २४४ गुरूवार दिनांक १७ एप्रिल २०२५ RNI Reg.NO./2021/83381 E-mail : aksharwartanews@gmail.com पृष्ठे : ४ किंमत २ रुपये

BEED (MAHARASHTRA) Year 4 Issue 244 wednesday Dt 17 April 2025 RNI Reg. NO./2021/83381 daily Marathi E-mail : akasharwartanews@gmail.com Pages 4 Prise Rs.2

### फडणवीस सरकारचा ऐतिहासिक निर्णय

# ६५ वर्षांनतर १५०० लोकसंख्येच्या 'या' गावात होणार कॅबिनेट बैठक

अहिल्यानगर (प्रतिनिधी):– पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थान असलेल्या चोंडी (ता. जामखेड) इथं लवकरच राज्य मंत्रिमंडळाची बैठक होणार आहे. अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाकडून त्याची जोरदार तयारी सुरू करण्यात आली आहे. ही बैठक २९ एप्रिल होणार असल्याची चर्चा आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३००व्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर चोंडी इथं अशी राज्य मंत्रिमंडळाची बैठक होणार असल्याचे त्याची राज्य पातळीवर चर्चा सुरू झाली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री आणि आताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या काळात १७ सप्टेंबरच्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचं औचित्य साधून छत्रपती संभाजीनगरमध्ये १६ सप्टेंबर २०२३मध्ये मंत्रिमंडळ बैठक झाली होती. त्यानंतर आता अशीच बैठक चोंडी इथं होणार आहे. यावेळी मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असणार आहेत.



महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६५ वर्षांनंतर, अशी खेडेगावात पहिल्यांदाच देवेंद्र फडणवीस यांच्या महायुती सरकारकडून, अशी बैठक होत आहे. ही ऐतिहासिक बैठक ठरणार आहे. अहिल्यादेवी होळकर यांची ३००वी पुण्यतिथी साजरी होत आहे. त्यांच्याच जन्मगावी राज्यमंत्रिमंडळाची बैठक होत असल्याने, या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार काय निर्णय घेणार याकडे लक्ष लागले आहे. राज्य मंत्रिमंडळाची अशी खेड्यात बैठक होण्याची ही पहिलीच वेळ आहे. त्यानुसार चोंडी या गावाची २०११च्या जनगणनेनुसार १८२१ लोकसंख्या आहे. अशा खेडे गावात राज्य मंत्रिमंडळाची बैठक होत असल्याने त्याला महत्त्व आले आहे. या बैठकीसाठी मुंबईत, नागपूरमध्ये राज्य मंत्रिमंडळाच्या जशा बैठका होतात, तशा तयारी अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाला करण्याची तयारी सुरू केली आहे. महायुती सरकारमध्ये ३६ मंत्री आणि सहा राज्यमंत्री या बैठकीला चोंडीत संभाव्य २९ एप्रिलला दाखल होणार आहेत. राज्याचे संपूर्ण मंत्रिमंडळाच चोंडी या खेडे गावी येणार असल्याने स्थानिकांनी या बैठकीची उत्सुकता लागली आहे.

## जिल्ह्यात उद्योगासाठी पोषक वातावरण राहिल यासाठी काम करा- मंत्री उदय सामंत

### *जिल्हा गुंतवणूक परिषदेला उत्तम प्रतिसाद;९३० कोटीची सामंजस्य करार*



बीड (प्रतिनिधी):– बीड जिल्ह्यात अधिक गुंतवणूक व्हावी यासाठी उद्योग विभागाने प्रयत्न करावेत तसेच मुख्यमंत्री रोजगार योजनेचे उद्दिष्ट पूर्ण होईल यासाठी काम करावे असे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत केले. आज त्यांच्या उपस्थितीत ९३० कोटी ११ लाख रुपयांचे करार झाले. उद्योग संचालनालय, जिल्हा उद्योग केंद्र तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मैत्री आणि जिल्हा प्रशासनाने संयुक्तरीत्या या परिषदेचे आयोजन केले होते. येथील ग्रॅंड यशोदा हॉटेलमध्ये ही परिषद झाली. जिल्ह्यातील ७४ उद्योजकांनी केलेल्या या करारामुळे थेट तसेच अप्रत्यक्षरित्या ६०३६ जणांना रोजगार प्राप्त होणार आहे. दिप प्रज्ज्वलनाने या परिषदेची सुरुवात झाली. यावेळी व्यासपीठावर खा. सांदिपान भुमरे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, एमआयडीसीचे मुख्य अभियंता गावंडे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक तसेच अनिल जगताप, राजेश देशमुख, उद्योग सहसंचालक बी. टी. यशवंते, जिल्हा उद्योग केंद्राचे पान २ वर...

### सरकार तुम्हारी तान्हाशाही..नही चलेंगी,नही चलेंगी!

## वक्फ बोर्ड बिलविरोधात मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डकडून मानवी साखळी आंदोलन

**बीड (प्रतिनिधी):– वक्फ बोर्ड बिलचा जोरदार विरोध करत ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डच्या वतीने संपूर्ण देशभरात मानवी साखळी आंदोलन सुरू करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून आज बीड येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रिडांगण येथे हजारो मुस्लिम बांधवांनी एकत्र येत आपला निषेध नोंदवला.या आंदोलनामध्ये सहभाग घेतलेल्या नागरिकांनी शांततामय मार्गाने वक्फ बोर्ड बिलविरोधात आपली भूमिका मांडली. यावेळी प्रसिद्ध धार्मिक वक्ते मुफ्ती मोहियोद्दीन यांनी आंदोलनकर्त्यांना वक्फ बिलाचे परिणाम व त्यातील तरतुदी याविषयी मार्गदर्शन केले.**






या आंदोलनाच्या माध्यमातून केंद्र सरकारने वक्फ बोर्ड संदर्भातील नवे विधेयक मागे घ्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.मुस्लिम समाजाच्या धार्मिक आणि सामाजिक हक्कांवर घाला घालणाऱ्या या बिलाचा तीव्र निषेध करत, देशभरात एकजूट दाखवत मुस्लिम बांधव आंदोलनाच्या माध्यमातून आपला आवाज बुलंद करताना दिसत आहे. वक्फ बिल विषय लोकांना मार्गदर्शन केले तसेच आज पासून सुरू झालेल्या मानवी साखळी आंदोलन दररोज प्रत्येक तालुक्यात होणार असल्याचा सांगण्यात आला आहे. बीड जिल्हयातील नेत्यांसह मराठा समाजाच्या नागरिकांना ही आपली उपस्थिती मोठ्या प्रमाणावर दर्शवली आहे. यावेळी मौलाना अब्दुल रहीम, मौलाना हाफिज जाकीर, मौलाना अखिल, शफीक हाशमी, मौलाना अब्दुल बाखी, मुफ्ती जावेद, मुफ्ती पान २ वर...

## लाडका शेतकरी योजना जाहीर

### प्रत्येक शेतकऱ्याला ६ हजार देणार, देवेंद्र फडणवीसांकडून मोठी घोषणा

मुंबई : विदर्भातील अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यात यश आले आहे. याचा मला आज खूप आनंद आहे. शेतकऱ्यांसाठी जमीन ही आईप्रमाणे असते आणि ती जाताना मोठे दुःख होते. २००६ ते २०१३ या काळात विदर्भातील शेतकऱ्यांची ज्या पद्धतीने



फसवणूक झाली, ती अत्यंत वेदनादायक आहे.

तत्कालीन सरकारने थेट खरेदी योजनेच्या नावाखाली शेतकऱ्यांकडून प्रतिज्ञापत्रे घेतली. त्यांचे सर्व हक्क गोठवण्याचे काम केले. जर शेतकऱ्यांना योग्य वाढीव किंमत दिली असती, तर ते मान्य होते, परंतु त्यांना कमी भाव देऊन त्यांचे हक्क हिरावून घेण्यात आले, असा गंभीर आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. ते अमरावतीत बोलत होते. मुख्यमंत्री झाल्यावर मी तातडीने निर्णय घेतला. शेतकऱ्यांची जमीन थेट खरेदी

## बलात्कार करतो का म्हणत भाजप पदाधिकाऱ्याची हत्या

माजलगाव (प्रतिनिधी):- शहरातील भाजप कार्यालयातून बाहेर निघालेल्या तालुका सरचिटणीसवर वार करत असताना ते तेथून पळाले. वाचवा म्हणत ओट्यावर बसलेल्या लोकांकडे पळाले असता त्यांच्यावर पाठीमागून आलेल्या आरोपीने कोयत्याने शरीराच्या एका बाजूस वार केला.'बलात्कार करतो का' असे म्हणत त्याच्या शरीरावर सपासप वार केले. यात पदाधिकाऱ्याचा



जागीच मृत्यू झाला. ही थरारक घटना मंगळवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास घडली. हत्येनंतर आरोपी पोलिसांना शरण आला.

बाबासाहेब प्रभाकर आगे (३४) असे मयताचे नाव आहे, तर नारायण शंकर फपाळ (३८) असे आरोपीचे नाव आहे. माजलगाव बसस्थानकापासून जवळच असलेल्या भाजप कार्यालयात भाजपचे तालुका सरचिटणीस व बीड जिल्हा लोकसभेचे विस्तारक असलेले बाबासाहेब आगे आपल्या पान २ वर...

## पाण्यासाठी छत्रपती संभाजीनगरला धडकले कडक उन्हात शेतकऱ्यांची मोटारसायकल रॅली

**गेवराई (प्रतिनिधी):– गेवराई तालुक्यातील गोदावरीच्या पात्रालगत असलेल्या अनेक गावांना पिण्यास पाणी नसल्याने ग्रामस्थ आणि जनावरांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. उन्हाळा सुरू झाला असूनही गोदावरीच्या पात्रात योग्य नियोजन न करता पाणी सोडल्याने गेवराई आणि अंबड तालुक्यातील दहा गावांना पिण्यास पाणी शिल्लक राहिले नाही. त्यामुळे पैठणच्या नाथसागरातून तात्काळ गोदावरी पात्रातील पाथरवाला बॅरेज पर्यंत पाणी सोडण्यात यावे अशी मागणी शिवसेनेचे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्यासह दहा गावच्या शेतकऱ्यांनी कडक उन्हात मोटर मोटरसायकल रॅली काढून छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय आयुक्त आणि कार्यकारी संचालक पाटबंधारे कडा विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.**



पैठणच्या नाथसागरातील पाणी गोदावरी पात्रात सोडल्यानंतर गेवराई तालुक्यातील शेकडो गाव, वाडी, वस्ती आणि तांड्यांना पाणी उपलब्ध झाल्याने भर उन्हाळ्यातील पाणी प्रश्न काही अंशी सुटतो. यावेळीही गुळजच्या बंधाऱ्यातून गोदावरी पात्रात पाणी सोडण्यात आले मात्र, ते शहागडच्या बंधार्यापर्यंतच आणि तेही अत्यल्प प्रमाणात. नदीपात्रात पडलेले मोठमोठे खड्डे आणि उष्णतेमुळे जमिनीत शोषले गेलेले पाणी यामुळे हे पाणी शहागडच्या बंधार्यातून खाली उतरून पाथरवाला बॅरेज पर्यंत पोहोचलेच नाही. त्यामुळे गेवराई तालुक्यातील आगर नांदर, संगम जळगाव, रेवकी, देवकी, हिंगणगाव, नागझरी तर अंबड तालुक्यातील कुरण, पाथरवाला, वाळकेश्वर या गावात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. यामुळे ग्रामस्थ आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. आणखी दीड ते दोन महिने उन्हाळ्याचे दिवस जाणार असल्याने तात्काळ गुळाच्या बंधाऱ्यातून गोदावरी पात्रात पाथरवाला बॅरेज पर्यंत पाणी सोडावे अशी मागणी या पान २ वर...

## मी अजित पवारांना कार्यक्रमाला बोलावणार नाही

### भाजपा आमदार गोपीचंद पडळकरांचं वक्तव्य

मुंबई : जपा आमदार गोपीचंद पडळकर यांना उपमुख्यमंत्री अजित पवार नकोसे झाले आहेत का अशी चर्चा सुरु झाली आहे. याचं कारण अहिल्यादेवींच्या जयंतीचं अजित पवारांना निमंत्रण देणार नाही अशी भूमिका गोपीचंद पडळकर यांनी घेतली आहे.



महत्त्वाचं म्हणजे या कार्यक्रमात अमित शाह यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निमंत्रित करण्यात आलं आहे. गोपीचंद पडळकर यांनी हा सरकारी कार्यक्रम नसल्याचा युक्तिवाद केला आहे. मात्र तरीही त्यांच्या या भूमिकेने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या ३०० व्या जयंतीनिमित्त तब्बल ५० हजार धनगरी ढोल वाजवून अभिवादन करण्यात येणार आहे. पुण्यात मे महिन्यातील दुसऱ्या आठवड्यात हा कार्यक्रम होणार आहे. अमित शाह यांनी या कार्यक्रमाला येण्याचं मान्य केल्याचं भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी सांगितलं आहे. कोणाकोणाला पान २ वर...

## संपादकीय...

# ‘शेअर बाजार’ उठला!

अमेरिकेकडून भारत, चीनसह ६० हून अधिक देशांवर आयात शुल्काची मात्रा काही तासांचा कालावधी शिल्लक असतानाच त्याचे नकारात्मक परिणाम जगभरातील शेअर बाजारावर उमटले. ७ एप्रिल सोमवारचा दिवस शेअर बाजारासाठी ‘ब्लॅक मंडे’ ठरला. भारतातील प्रमुख शेअर बाजारांनी एकाच सत्रात सुमारे ५ टक्क्यांची आपटी खाल्ली. टाटा, अंबानी, अदानीसह बहुतांश बड्या उद्योगसमूहांचे शेअर्स सोमवारी मोठ्या प्रमाणात घसरले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या करवाढीनंतर आणि चीनकडून ‘जशास तसे’ प्रत्युत्तर मिळाल्यानंतर जागतिक बाजारपेठेत झालेल्या पडझडीमुळे आर्थिक मंदीची भीती निर्माण झाली आहे. सोमवारी जगभरातील प्रमुख शेअर बाजार कोसळले. भारतात मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स एकाच व्यवहारात तब्बल २२२६.७९ अंकांनी घसरला. निफ्टीतही जवळपास ३ टक्क्यांची घसरण नोंदली गेली. मुंबई शेअर बाजारातील ही गेल्या १० महिन्यांतील एका दिवसातील सर्वांत मोठी घसरण आहे. या आधी ४ जून २०२४ रोजी सार्वत्रिक निवडणूक निकालादरम्यान शेअर बाजारात मोठी घसरण झाली होती.

सोमवारच्या ‘ब्लॅक मंडे’मुळे मुंबई शेअर बाजारातील गुंतवणूकदारांना १४ लाख कोटी रुपयांचा फटका बसला आहे. बाजारात सूचिबद्ध कंपन्यांचे बाजारमूल्य शुक्रवारच्या ४०३ लाख कोटी रुपयांवरून थेट ३९० लाख कोटी रुपयांवर येऊन ठेपले. अमेरिकेत महागाई नाहीच असे डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. तेलाचे दर खाली आले आहेत, व्याजदरही कमी आहेत, अन्नधान्याचे दरही किमान आहेत. याचा अर्थ अमेरिकेत महागाई नाही असे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी म्हटले आहे. अमेरिकेतील शेअर बाजारात सातत्याने पडझड होत असताना ट्रम्प यांनी फेडरल रिझर्व्हने व्याजदरात कपात करावी अशी सूचना केली. १३.२ टक्के घसरणीसह हाँगकाँग शेअर बाजाराने १९९७ नंतरची सर्वांत मोठी आपटी खाल्ली. २०२१ नंतर पहिल्यांदाच अमेरिकन कच्च्या तेलाचा भाव ६० डॉलर प्रति बॅरलच्या खाली आला. याचवेळी १ लाख डॉलरच्या नव्या शिखरावर पोहोचलेला बिटकॉईन ७८ हजार डॉलरच्या खाली आला. टॅरिफ मागे घेण्यास ट्रम्प यांनी नकार दिल्याने जागतिक व्यापाराला धक्का बसला. यावर कडी करताना ट्रम्प यांनी चीनला नव्याने वाढीव शुल्काची धमकी दिली. त्यामुळे जगभरात अस्थिरता आणि अनिश्चितता आहे. ट्रम्प यांच्या निर्णयामुळे भारतीय गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे ४६ लाख कोटी रुपयांची घट झाली.

शेअर बाजार सुरू होताच सेन्सेक्स ३ हजार अंकांनी खाली आला. निफ्टीमध्ये ९०० अंकांची घसरण झाली. त्यामुळे सोमवारी भारतीय गुंतवणूकदारांचे १९ लाख कोटी बुडाले. सायंकाळी काही अंशी बाजार सावरला. व्यापारयुद्धामुळे महागाई वाढण्याची शक्यता आहे. व्यापारयुद्धाची धग अमेरिकन अर्थव्यवस्थेपर्यंत पोहोचली आहे. अशीच स्थिती राहिल्यास संपूर्ण जगाच्या आर्थिक अडचणी वाढू शकतात. भारतासारख्या देशालाही याची फार मोठी किंमत मोजावी लागू शकते. यामुळे जगभरात महागाईच्या झळा अतिशय तीव्र होणार आहेत. यात सर्वसामान्य माणूस भरडला जाणार आहे. जे. पी. मॉर्गनच्या अंदाजानुसार अमेरिका आणि जगभरात मंदीची शक्यता ६० टक्क्यांवर पोहोचली आहे. ट्रम्प यांनी सत्तेवर आल्यावर आयात करवाढ करू असे म्हटले होते. त्यानुसार जगभरातील देश सावध झाले होते. पण ट्रम्प नेमकी काय घोषणा करणार याचा अंदाज येत नव्हता. एकदाचा आयात करवाढीचा निर्णय जाहीर झाला आणि जगभरात मोर्चेबांधणी सुरू झाली. भारताकडून मात्र काहीच उत्तर दिले गेले नाही. त्यामुळे मोदी यांनी ट्रम्प यांच्यासमोर नांगी टाकली अशी चर्चा सुरू झाली. त्याबाबत तशी उदाहरणेही पुढे आली. अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणा-या भारतीय नागरिकांच्या हाता-पायात बेड्या घालून त्यांना भारतात पाठवण्यात आले.

या अपमानास्पद प्रकाराबाबत भारत सरकारने निषेधाचा एकही सूर उमटवला नाही. अमेरिकेच्या आयात करवाढीमुळे भारतीय शेअर बाजारात प्रचंड पडझड झाली. परंतु त्याविरोधात मोदी सरकारने साधा ‘ब्र’ ही उच्चारला नाही. अजूनही अमेरिकेत अनेक भारतीय नागरिक बेकायदेशीरपणे राहत आहेत. त्याबाबत अथवा त्यांना परत आणण्याबाबत मोदी सरकारने आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. ट्रम्प यांच्या निर्णयामुळे भारतीय नागरिकांची आणि गुंतवणूकदारांची जी घुसमट होत आहे त्याबाबत केंद्र सरकारला तटस्थ राहता येणार नाही, काहीतरी निर्णय घ्यावाच लागेल. अमेरिकेच्या आयात शुल्काचे भारतावरील विपरीत परिणाम एका दिवसापुरतेच मर्यादित नाहीत. आगामी काळ यापेक्षाही खडतर असू शकतो. त्या दृष्टीने केंद्र सरकारला तयार रहावे लागेल. लाखोच्या संख्येने लोक ट्रम्प यांच्या निर्णयाविरोधात रस्त्यावर उतरले आहेत पण त्यामुळे ट्रम्प माघार घेतील असे वाटत नाही. कारण माथेफिरू नेतृत्व सगळ्यांनाच तापदायक ठरते. अमेरिकन जनता ट्रम्प यांना वठणीवर आणेल पण त्यासाठी थोडा वेळ लागेल. तूर्त सध्या भारताला चीन अथवा कोलंबियासारखी ठाम आणि जशास तशी भूमिका घ्यावी लागेल. उद्योगपती गौतम अदानींना वाचवण्यासाठी मोदी सरकार अमेरिकेपुढे नमती भूमिका घेत आहे, असा आरोप केला जात आहे. गौतम अदानी यांच्या विरोधात अमेरिकेत करचुकवेगिरीच्या आरोपाखाली खटला सुरू आहे.

त्यातून त्यांची सुटका करण्यासाठी मोदी सरकारने अमेरिकेपुढे नमते धोरण घेतल्याचे सांगितले जाते. याबाबत मोदी सरकारला स्पष्टीकरण द्यावे लागेल.

# ‘मुख्यमंत्री जनसेवा दूत योजना’ राबवण्याची मागणी-यादव

## – जनतेला गावातच न्याय मिळावा, प्रशासन अधिक लोकाभिमुख व्हावे यासाठी नाविन्यपूर्ण योजना निवेदन

मुंबई (प्रतिनिधी): क्रांती ग्राम विकास संस्था अध्यक्ष सुरेश यादव यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना सादर केलेल्या मुख्यमंत्री जनसेवा दूत योजना प्रस्तावाने प्रशासन व्यवस्थेत परिवर्तन घडवण्याची क्षमता असल्याचे दिसून येते. ही योजना राज्यातील सामान्य नागरिकांना गावाच्या पातळीवरच सरकारी सेवा मिळवून देण्याचा हेतू ठेवते. योजनेचा मुख्य उद्देश: राज्यातील नागरिकांना त्यांच्या तक्रारी, निवेदने किंवा मागण्यांसाठी वारंवार सरकारी कार्यालयांना भेटी देण्याची गरज भासू नये. यामुळे वेळ, पैसा आणि मनस्ताप वाचवला जाईल. यासाठी सरकारने मुख्यमंत्री जनसेवा दूत योजना राबवावी, अशी मागणी सुरेश यादव यांनी केली आहे. योजनेची वैशिष्ट्ये: १. प्रत्येक तीन महिन्यांनी एक दिवस ‘मुख्यमंत्री जनसेवा दूत दिन’ वर्षातील १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै आणि १ ऑक्टोबर रोजी संपूर्ण राज्यभर एकाच दिवशी ही योजना राबवण्यात यावी. त्या दिवशी गावात





तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, तसेच इतर स्थानिक अधिकारी सकाळी ८ ते १२ या वेळेत उपस्थित राहून नागरिकांकडून थेट निवेदने स्वीकारतील. ही निवेदने त्या दिवशीच तहसील कार्यालयात जमा केली जातील आणि त्यावर कार्यवाही सुरू केली जाईल. २. तहसील कार्यालयांमध्ये विशेष मुख्यमंत्री जनसेवा दूत कक्ष प्रत्येक तहसील कार्यालयात स्वतंत्र मुख्यमंत्री जनसेवा दूत कक्ष स्थापन करण्यात यावा. या कक्षामार्फत आलेली सर्व निवेदने विभागवार छाटून संबंधित अधिकाऱ्यांकडे तात्काळ पाठवली जातील. नागरिकांना त्यांच्या अर्जाची स्थिती डचड किंवा फोनद्वारे कळवली जाईल.

३. प्रशासनाची जबाबदारी व मार्गदर्शन: मुख्यमंत्री कार्यालयाकडून जिल्हाधिकारी, तहसीलदार व इतर संबंधित अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना वेळेवर दिल्या जातील. संपूर्ण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एक स्वतंत्र राज्यस्तरीय देखरेख यंत्रणा विकसित केली जाईल. ४. योजनेचे अपेक्षित फायदे: मंत्रालयात अनावश्यक गर्दी टळेल. नागरिकांच्या तक्रारी स्थानिक पातळीवरच जलदगतीने निकाली निघतील. प्रशासन अधिक पारदर्शक व जबाबदार बनेल. सामान्य नागरिकांना अधिकृत व जलद सेवा मिळेल. लोकशाही अधिक बळकट होईल. ५. संवादासाठी ’मुख्यमंत्री जनसंवाद दूत’ उपक्रम: अधिकारी गावागावात जाऊन थेट नागरिकांशी संवाद साधतील. जनतेला शासनाशी थेट जोडण्यासाठी संवादाचा पूल उभारला जाईल. ६. योजनेच्या शुभारंभाची कल्पना: या योजनेची सुरुवात करताना मुख्यमंत्री स्वतः एखाद्या गावात जाऊन नागरिकांकडून निवेदने स्वीकारावीत. यामुळे जनतेत विश्वास निर्माण होईल व योजनेचा प्रचार-प्रसार राज्यभर होईल.निष्कर्षतः सुरेश यादव यांनी सादर केलेल्या या योजनेतून लोकशाही अधिक लोकाभिमुख बनवण्याची क्षमता आहे. सामान्य नागरिकांना गावाच्या पातळीवरच न्याय मिळवून देणारी ही योजना राज्यभरातील प्रशासनासाठी एक मार्गदर्शक ठरू शकते. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र जी फडणवीस यांना ही योजना तातडीने राबवण्याची विनंती केली आहे.

# प्रलंबीत तसेच दाखलपूर्व प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये सुनावणीसाठी ठेवा

बीड (प्रतिनिधी):- महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशानुसार दिनांक १० मे २०२५ रोजी बीड जिल्हा न्यायालय व सर्व तालुका न्यायालयामध्ये मा.श्री.आनंद एल.यावलकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांचे मार्गदर्शनाखाली लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर लोकन्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे आणि दाखल पूर्व प्रकरणे सुनावणीसाठी लोक अदालतीमध्ये ठेवता येतील. संबंधित पक्षकारांनी आपल्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी येत्या १० मे २०२५ रोजी आयोजित केलेल्या लोकअदालतीमध्ये आपले प्रकरणे तडजोडीसाठी ठेवावे असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश व.स्तर श्री.जी.जी.सोनी यांनी केले आहे. या पूर्वी दिनांक २२ मार्च २०२५ रोजी झालेल्या लोकन्यायालयामध्ये संपूर्ण बीड जिल्हयातून प्रलंबीत व दाखलपूर्व असे एकूण ५६४०८ प्रकरणे ठेवण्यात आली होती त्यापैकी ५६०८ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. यामध्ये जवळपास १७ कोटी ३३ लाख ३३ हजार १५६ रूपयांच्या प्रकरणामध्ये तडजोड झाली.



**लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि सुंदरनगर तेलगाव कारखाना कार्यालयात भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.प्रतिमेस विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड, कर्मचारी संघटना उपाध्यक्ष दत्ता सोळंके, अशोक पाटील,दासराव मोरे,अजय लगड, राहुल सावंत, अशोक तिडके, उल्हास मुजमुले, अर्जुन गालफाडे आदी**

पान ४ वरून..

**पाण्याची समस्या दूर!**

आता या क्षेत्रात स्वच्छ, सुरक्षित आणि पुरेशा पाण्याची उपलब्धता करण्यात आली आहे. आम्ही ही योजना पूर्ण गावातील पाणी पुरवठा समितीच्याकडे हस्तातरीत केल्यानंतर याची संपूर्ण देखभाल व दुरुस्ती करण्याची जिम्मेदारी ही पाणी पुरवठा समिती करणार आहे. ही योजना यशस्वी राबविण्यासाठी एच पी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संतोष रेपे, मधुकर वाघ, अरविंद पवार, प्रकाश काळे, विनोद सारुख, जनक सानप, सचिन आडे, सुनिता विभूते, सोजरबाई सारुख, शिल्पा आडे, यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकंती करणारा हा तांड्याला आत्ता हक्काचे पाणी मिळाले आहे ही योजना* दीर्घकाळ टिकवणे ही वयक्तिक आईचा तांड्यावरील ग्रामस्थ व पाणी पुरवठा समितीची जबाबदारी आहे

– संतोष रेपे प्रकल्प समन्वयक युवा ग्राम बीड

--------------------

**सांस्कृतिक पुनरुज्जीवनासाठी**

घ्यावे, अशी विनंती डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केली असून, अशी संधी मिळाल्यास त्यांना आनंद होईल असे त्यांनी नमूद केले.

मंत्री सकारात्मक निर्णय घेतील

या सर्व मागण्या बीडच्या सांस्कृतिक जडणघडणीसाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. मंत्री उदय सामंत यांनी या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केली आहे.

----------------------

**बदलत्या जीवनशैलीमुळे किशोरवयीन**

हे सातत्याने घेत आहेत. शिक्षण, आरोग्य आणि क्रीडा क्षेत्रात आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी नेहमीच टॉपवर आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना आरोग्य विषयी सखोल माहिती मिळावी यासाठी – डॉ. पूजा माने यांचे व्याख्याने ठेवले होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. पुजा माने म्हणाल्या की, आजच्या धावपळीच्या आणि बदलत्या जीवन शैलीच्या युगात किशोरवयीन मुलींमध्ये पीसीओएस (पॉलिसिस्टिक ओव्हेरियन सिंड्रोम) हा विकार वेगाने वाढताना दिसत आहे. हार्मोनल असंतुलनामुळे निर्माण होणाऱ्या या समस्येमुळे मासिक पाळीच्या तक्रारी, वजनवाढ, केस गळणे, चेहऱ्यावर केस येणे तसेच भविष्यात गर्भधारणेतील अडचणी अशा अनेक त्रासदायक लक्षणांचा सामना मुलींना करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर किशोरवयीन मुलींमध्ये झउजड विषयी योग्य माहिती, त्याची कारणे, लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, आहार आणि जीवनशैलीत बदल याविषयी जागरूकता निर्माण करणे हे या व्याख्यानाचे प्रमुख उद्दिष्ट होते. आजाराचे निदान लवकर झाल्यावर योग्य सवयींमुळे या समस्येवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. असे स्त्रीरोग तज्ज्ञ पुजा माने- जाधव म्हाणाल्या. यावेळी आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा, आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, डॉ. मयुरी शिंदे, डॉ. मीरा नागरे, डॉ. विनोद राहिंज, डॉ. प्रगती राख, डॉ. मोहिते, डॉ मार्कंड, रामेश्वर ढोबळे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्रा.डॉ. मयुरी शिंदे यांनी विद्यार्थ्यांना जागतिक आरोग्य दिनानिमित्त आरोग्य कसे सुधारावे याबद्दल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी सानिया बनेवाले, स्वरांजली मस्के व लक्ष्मी कोटगीरवार यांनी केले. आभार डॉ. मीरा नागरे यांनी मानले.

दर्जेदार शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांचे आरोग्यही महत्वाचे- डॉ. आदिती सारडा

आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी विविध क्षेत्रात टॉपवर आहेत. दर्जेदार शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांना आरोग्याचे धडे मिळाले आणि त्यांनी ते आत्मसात केले तर त्यांचे जिवन सुखकर होते. यासाठी आदित्य शिक्षण संस्थेत शिक्षण, क्रीडा आणि आरोग्य या विषयावर नेहमीच विविध तज्ज्ञांचे व्याख्यान, मार्गदर्शन ठेवले जाते. त्यामुळे आमचे विद्यार्थी आज सर्वत्र टॉपवर आहेत.

– डॉ. आदिती सारडा, संचालिका आदित्य शिक्षण संस्था, बीड

----------------------

**आंधळे यांच्या शुभहस्ते**

गौरव,चि. मुंडे गोरख,चि.रोकडे कुणाल,चि.घुमरे श्रीराज,कु.झाडे श्रावणी,कु. वरवडे जान्हवी,चि.बोंगार्डे सौजन्य,कु.चौरे अक्षरा,चि.उजगरे कार्तिक,कु.कप्पे हर्षदा या १४ गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह बुक देऊन कार्यक्रमाचे अध्यक्ष संजयभाऊ आंधळे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. एनएमएमएस शिष्यवृत्तीस पात्र झालेल्या १४ विद्यार्थ्यांना पुढील पाच वर्षाच्या शिक्षणासाठी आठ लक्ष चाळीस हजार (८४०,०००) रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे.एनएमएमएस परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे विभाग प्रमुख चव्हाण बी.बी.,श्री.चांदणे सर,श्री.राऊत एम.बी.,श्री.गिलबिले सर,श्री.मुंडे ए.बी.,श्री.डमरे सर,श्रीमती मंत्रे मॅडम यांचे मा.संजयभाऊ आंधळे तसेच प्राचार्य राऊत डी.डी.,उपप्राचार्य मस्के सर यांनी अभिनंदन केले. याप्रसंगी विद्यालयाचे उपप्राचार्य मस्के सर,श्री.डोईफोडे सर,प्रमुख वक्त्या श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या अनुषंगाने विचार व्यक्त करून गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले त्यानंतर अध्यक्ष समारोपर विचार व्यक्त करताना मा.संजयभाऊ आंधळे म्हणाले की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानामुळे भारत देश आज एक संघ आहे त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करून त्यांनी जयंतीच्या शुभेच्छा दिल्या तसेच एनएमएमएस शिष्यवृत्तीस पात्र झालेल्या सर्व विद्यार्थी,पालक व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी. यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंडील जी.पी.यांनी केले व उपस्थितांचे आभार प्रा.मुंडे सी.व्ही.यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने गुणवंत विद्यार्थी, पालक,शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

पान १ वरून..

**वक्फ बोर्ड बिलविरोधात मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डकडून मानवी साखळी आंदोलन**

आरीफ साहेब, मौलाना अमिन, मौलाना साबीर, मुफ्ती गय्यास, मुफ्ती युनूस, मुफ्ती मैनुद्दीन कासमी यांच्यासह बीड विधान सभेचे आ. संदीप क्षिरसागर, सय्यद सलीम, अशोक हिंगे, गणेश वरेकर, ड. शफीक भाऊ, नितीन जयभाय, मोईन मास्टर, फरोक पटेल, खुर्शिद आलम, रविंद्र दळवी, देशमुख, आदी मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते.

--------------------

**जिल्ह्यात उद्योगासाठी पोषक वातावरण राहिल यासाठी काम करा- मंत्री उदय सामंत**

महाव्यवस्थापक किरण जाधव, व्यवस्थापक विजय काकड, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी डी.व्ही. फताटे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव इनकर व विश्वमाला इनकर यांनी केले.

--------------------

**बलात्कार करतो का म्हणत भाजप पदाधिकाऱ्याची हत्या**

साथीदारांसह बसले होते. दुपारी अडीच वाजेच्या सुमारास ते कार्यालयातून बाहेर पडत असताना हातात कोयता घेऊन आलेल्या नारायण फपाळ याने अचानक येऊन बाबासाहेब आगेंवर वार करण्याचा प्रयत्न केला. सकाळपासूनच करत होता पाठलाग सकाळपासून नारायण हा बाबासाहेब आगे यांचा पाठलाग करत होता. तो भाजप कार्यालयात बसलेला असताना नारायण हा बाजूलाच असलेल्या एका दुकानासमोर दबा धरून बसला होता. जसा तो बाहेर आला, तसा याने वार केला; परंतु तो चुकवला आणि पुढे जाऊन पुन्हा पकडून वार केले. हत्या केल्यानंतर आरोपी नारायण हा स्वत:हून माजलगाव शहर पोलिस ठाण्यात गेला. तेथे हजर अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्याने आपण खून केल्याची कबुली दिली.

------------------------

**पाण्यासाठी छत्रपती संभाजीनगरला धडकले कडक उन्हात शेतकऱ्यांची मोटारसायकल रॅली**

भागातील शेतकऱ्यांनी केली होती. याबाबत सहा दिवसांपूर्वीच बदामराव पंडित यांनी गोदावरी पात्रातून पाणी सोडण्याबाबत निवेदन देऊन संबंधित विभागाला आंदोलनाचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्यासह यशवंत नागरे, कानिफनाथ नागरे, युवराज कोकरे, राजाभाऊ आतकरे, गंगासिंग परदेशी, तानाजी जोगदंड, गणेश बोंद्रे, वशिष्ठ शिंदे, संभाजी चोरमले, कल्याण मदने, श्रीराम काळे, भाऊसाहेब नरोटे, भाऊसाहेब शिंदे, सदाशिव मुळे, रवींद्र शिरसाट, साळीकराम कोळेकर, राम आरेकर, ज्ञानेश्वर काळे, कोंडीराम जाधव, साहेबा पवार, भागवत मोटे, विनायक नकाते, भरत जाधव, श्रीराम काळे, दत्तात्रय भारती, दादाराव मोटे, पांडुरंग काळे, सुदाम मदने, महादेव आरेकर, तुकाराम जाधव, मनसुख जाधव, अशोक जाधव, भारत परदेशी, मुक्ताराम काळे, सदाशिव आतकरे, रामप्रसाद कोकरे, शेख वाजेद, कल्याण मदने, भाऊसाहेब माखले, मिलिंद वाघमारे आदींसह शेतकऱ्यांनी छत्रपती संभाजीनगर येथे जाऊन विभागीय आयुक्त आणि कार्यकारी संचालक पाटबंधारे कडा विभाग यांना निवेदन देऊन पाणी न सोडल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. यावेळी शेतकऱ्यांनी गेवराई ते छत्रपती संभाजीनगर अशी भर उन्हात मोटरसायकल रॅली काढली होती.

--------------------

**लाडका शेतकरी योजना जाहीर**

करायची असल्यास शेतकऱ्यांना जमिनीच्या किंमतीच्या ५ पट पैसे द्यावे लागतील, असा शासन निर्णय (जीआर) काढला. तीन वर्षांपूर्वी ज्या जमिनीची किंमत लाख रुपये होती, ती आता १८ लाखांवर गेली आहे. बळीराजा संघर्ष समितीने यासाठी मोठा लढा उभारला होता. दुर्दैवाने आपले सरकार गेल्यानंतर, ज्यांनी २००६ ते २०१३ मध्ये शेतकऱ्यांना फसविले, त्यांचेच सरकार पुन्हा आले. त्यामुळे मोठे आंदोलन झाले, परंतु सरकारने कोणतीही दखल घेतली नाही. तत्कालीन जलसंपदा मंत्र्यांनीही यात काही करता येत नसल्याचे सांगितले. कायद्याच्या आणि नियमांच्या चौकटीत काहीही करता येत नाही, असे दिसत होते. प्रतापदादा रोज भेटून काहीतरी मार्ग काढण्याची विनंती करत होते. त्यानंतर आम्ही विधी व न्याय विभागाकडे मार्गदर्शन मागवले आणि राज्याच्या महाधिवक्त्यांशी (डव्होकेट जनरल) चर्चा केली. सरकारी पैसा खर्च करताना कायदेशीर बाजू तपासणे अत्यंत गरजेचे असते, असे देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले. ’कायदेशीर वाट नाही म्हणून अन्याय सहन करायचा, हे योग्य नाही.’ जलसंपदा अधिकाऱ्यांनीही कणखर भूमिका घेतली. विदर्भात नेहमीच असा अन्याय का होतो, याची मला खंत वाटत होती आणि याच वेदनेतून आपण काम केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी सांगितले आहे की, अन्याय करणारा कायदा बदलला पाहिजे. सर्वात आधी शेतकऱ्यांना चेक देण्यात आले. त्यावेळी त्यांच्या डोळ्यात पाणी आले आणि त्यांनी आपले ओझे हलके झाल्याची भावना व्यक्त केली. जराड साहेब यांनी दिलेली मिठी ही हार-तुऱ्यांपेक्षा अधिक महत्त्वाची होती, असे फडणवीस म्हणाले.

जमिनी संपादनावेळी शेतकऱ्यांना जास्त मोबदला मिळाला पाहिजे

यासोबतच, मृदू जलसंधारण विभागाच्या जमिनी विकत घेण्यासंदर्भात आठ दिवसांत नवीन शासन निर्णय काढण्यात येईल. प्रकल्पग्रस्त महामंडळ स्थापन करण्यात आले असून, त्यांना भागभांडवल देऊन त्यांच्या मुलांना रोजगारासाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाईल. प्रकल्पग्रस्तांची यादी वाढत असून, त्यांना काम देणे महत्त्वाचे आहे, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आम्ही असा कायदा केला आहे की, जमिनी संपादनावेळी शेतकऱ्यांना जास्त मोबदला मिळाला पाहिजे. जिथे जमिनीचे संपादन होणार आहे, तिथे शेतकऱ्यांनी जमिनी विकू नयेत, कारण जमिनीचा पैसा हा थेट शेतकऱ्यांनाच मिळाला पाहिजे. २००६ ते २०१३ मधील शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत ही योजना सुरू राहील, ती बंद होणार नाही. काही अडचण आल्यास आमदार आणि मंत्र्यांशी संपर्क साधावा, कोणत्याही दलालाच्या फंदात पडू नये, असे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी केले.

प्रत्येक शेतकऱ्याच्या जमिनीचे ड्रोन व उपग्रहाच्या मदतीने डिजिटायझेशन

याव्यतिरिक्त, बळीराजा जलसंजीवनी योजना आणली असून, त्या अंतर्गत अनेक प्रकल्पांना लवकरच मंजुरी देण्यात येणार आहे. वैनगंगा-नलगंगा नदी जोड प्रकल्प समृद्धी महामार्गाप्रमाणेच पूर्ण केला जाईल. या ६०० किलोमीटरच्या नदीजोड प्रकल्पामुळे ७ जिल्हे दुष्काळमुक्त होणार असून, एकही शेतकरी कोरडवाहू राहणार नाही, सर्व शेतकरी बागायती होतील. शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज पुरवठा केला जाईल. राज्यात टेक्सटाईल पार्क उभारण्यात येत असून, त्यामध्ये २ लाख लोकांना रोजगार मिळेल. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा यासाठी वेगळे क्लस्टर तयार करण्यात येणार आहेत. नानाजी देशमुख योजनेचे फळ आज दिसत असून, ६ हजार कोटी रुपयांचा नानाजी देशमुख योजनेचा दुसरा टप्पा सुरू करण्यात येणार आहे. अन्न प्रक्रिया उद्योगाचे छोटे प्रकल्प तयार केले जातील आणि प्रत्येक शेतकऱ्याच्या जमिनीचे ड्रोन व उपग्रहाच्या मदतीने डिजिटायझेशन केले जाईल, त्यामुळे पंचनाम्यांसारख्या अडचणी दूर होतील, असे देवेंद्र फडणवीसांनी म्हटले.

----------------------

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शोषित समाजासाठी संविधानात्मक तरतूद करून त्यांच्या अधिकारांना बळकटी दिली -पो. नि.मुदीराज

बीड (प्रतिनिधी):- शिका, संघटित व्हा, संघर्ष करा,' हा उद्धाराचा राजमार्गच बाबासाहेबांनी संपूर्ण भारतीयांना दिला. क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सामाजिक, शैक्षणिक, विषमतानिर्मूलनाच्या कार्याचा वारसा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढे चालविला आणि त्यांना गुरुस्थानी मानून सामाजिक क्रांतीचे कार्य अधिक सक्षम बनविले. शोषितवर्गाचे शिक्षण झाले पाहिजे, हा त्यांचा आग्रह होता. देशातील विषमतेला नष्ट करणारा एकमेव उपाय म्हणजे शिक्षण होय, असे त्यांचे मत होते. शांताराम गरुड यांच्या मते 'शिक्षणाची ओढ, अध्यापन निष्ठा, यांचे पूर्वसंचित आणि महात्मा फुले यांच्या समाजपरिवर्तनासाठी प्रबोधन, संघटन व आंदोलन यांच्या लोकविलक्षण कार्यसिद्धीचे सांस्कृतिक पूर्वसंचित अशी अनेकविध पूर्वसंचितांची शिदोरी पचवित भारतरत्न डॉ. बाबासाहेबांचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व घडलेले आहे. लंडनमधून 'बॅरिस्टर' ही पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी संपूर्ण आयुष्यभर भारतीय समाज व्यवस्थेने शोषण केलेल्या शोषित समाजासाठी कार्य केले आणि संविधानात्मक तरतूद करून त्यांच्या अधिकारांना बळकटी दिली असल्याचे प्रतिपादन पेठ बीडचे पोलीस निरीक्षक मुदीराज यांनी जिव्हाळा बेघर निवारा येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंती उत्सवानिमित्त आयोजित अभिवादन सभेप्रसंगी व्यक्त केले.

सोमवार दि.१४ एप्रिल रोजी शहरातील जिव्हाळा बेघर निवारा येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी पेठ बीडचे पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज , माजी नगरसेवक गणेश वाघमारे, राजूभाऊ सोपानराव वंजारे (जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय), पोलीस उपनिरीक्षक तथा कार्यक्रमाचे मार्गदर्शक राजाभाऊ गुळभिले, कार्यकारी संपादक अदनान खान, कलिम इनामदार, अल्ताफ शेख, अजय सानप पोलीस शिपाई बीड, राठोड मॅडम, गोरे मॅडम, बबीता इंगोले मॅडम महिला पोलीस बीड, जिव्हाळा केद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे, संचालक अभिजीत वैद्य, छाया सरोदे, यश वंजारे आदींची उपस्थिती होती.

यावेळी मनोगत व्यक्त करताना गणेश वाघमारे म्हणाले की महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन सभा व गरजुंना अन्नदान या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले हे उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी असून बीड नगर परिषद अंतर्गत चालविले जात असलेल्या बेघर निवारा केंद्रास सर्व पध्दतीने



सहकार्य करु असे आश्वासन त्यांनी दिले. याप्रसंगी प्रास्ताविकात जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे म्हणाले की जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात बेघर असलेले गरजु निराधार लाभार्थी घर, परिवारापासून निराधार झालेले काही लाभार्थी येथे रहातात. या रंजल्या, गांजल्यांची सेवा या पेक्षा मोठ काय या विचारातून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून येथील आश्रितांना अन्नदान करुन भीम जयंती साजरी करण्यात आली यापेक्षा आनंदाचा क्षण दुसरा नसून सर्व मान्यवरांनी येथील वयोवृद्ध महिला पुरुष लाभार्थी यांच्याशी मोकळा संवाद साधला तसेच आमचे मित्र तथा ज्याचे येथील सर्वाशी जवळचे नाते आहे असे निराधाराचे खरे श्रावण राजाभाऊ गुळभिले त्यांचे वेळोवेळी सहकार्य लाभते असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत वैद्य, छाया सरोदे, यश वंजारे यांनी उपस्थितांचे आभार मानले तर कार्यक्रमासाठी अनेकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तसेच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून संतोष बजाज, सिताराम बांगड, शैलेश भुतडा यांनी जिव्हाळा बेघर निवारा केंद्रास उन्हाळ्यापासून थंड हवेचा गारवा मिळण्यासाठी कुलर भेट दिला असून याप्रसंगी संतोष सारडा, बद्री गिलडा आदींची उपस्थिती होती

## पिंपरखेडच्या अंध विद्यार्थी संजय आडागळे याचा सर्वांनी आदर्श घ्यावा : प्रा प्रकाश खळगे

वडवणी (प्रतिनिधी):- वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथील एका मागासवर्गीय समाजातील दोन्ही डोळ्यांनीअंध असणारे संजय अडागळे,आणि बाळू अडागळे यांनी आपल्या अपंगात्वावर व अंधत्वपणावर मात करून. दोघेही भाऊ शासकीय नोकरीत कार्यरत आहेत ,,संजय हा सांगली या ठिकाणी मॅनेजर या पदावरची,, त्याचाच असणारा दुसरा भाऊ बाळू अडागळे, याने सुद्धा मुंबई महानगरपालिकेमध्ये उप आयुक्त या पदावर आपली नोकरी कायम केलेली आहे. सध्याच्या जमान्यामध्ये मेहनतीला आणि अभ्यासाला खूप महत्त्व आहे.. हे दोन्ही भाऊ अतिशय हुशार आहेत.. त्यांनी आपल्या स्वतःच्या बुद्धीच्या जोरावर,, रात्रंदिवस अभ्यास करून, परिपूर्ण असणाऱ्या माणसांना एक नवीन दिशा आणि नवीन प्रेरणा देण्याचे काम केलेला आहे.. आत्ताच्या धकाधकीच्या जीवनामध्ये ,,नोकऱ्या मिळवणे चांगल्या चांगल्या, अतिशय हुशार लोकांना कठीण होऊन बसलेले



असताना, या दोन अंध विद्यार्थ्यांनी मात्र आपल्या आई आणि वडिलांचे स्वप्न पूर्ण केलेल आहे . अतिशय ग्रामीण भागामध्ये राहून व छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयाचे सचिव खळगेसर यांच्या मार्गदर्शनाखाली सतत विचारपूस करून ,,त्यांनी आपल्या जीवनातील संधीचं सोनं केलेलं आहे.. या अपंग विद्यार्थ्यांना,, अंध विद्यार्थ्यांना, त्यांच्या जीवनामध्ये प्रेरणा मिळावी म्हणून वाचनालयाच्या माध्यमातून त्यांचा सत्कार करून, सन्मान करण्यात आला.. त्यांच्या सोबतच त्यांचे असणारे आई-वडील त्यांनी कठीण मेहनत करून आपल्या मुलांना कसल्याच प्रकारची अडचण भासू दिली नाही म्हणून त्यांच्या आई-वडिलांचा सुद्धा सन्मान करण्यात आला .त्यांचा सत्कार सोहळा गावकऱ्यांनी केला .. या अंध विद्यार्थ्यांचा आदर्श गावातील सर्व विद्यार्थ्यांनी,, पालकांनी व परिपूर्ण असणाऱ्या लोकांनी या दोन अंधभावांचा,, आदर्श घेऊन आपल्या मुलांमध्ये सुद्धा तशी जिद्द निर्माण करावी,, अशी कळकळीची विनंती खळगे सर यांनी केली. . छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयामध्ये सतत विविध प्रकारचे उपक्रम चालू असतात दिनांक ११ ४ २०२५ पासून महात्मा फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने ते १४ एप्रिल २०२५ पर्यंत ,,विविध सांस्कृतिक उपक्रम राबवून,, विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करून, विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याचं काम ग्रंथालयाच्या ग्रंथपाल, सौ .शीलाताई सुखदेव उजगरे,, मार्गदर्शक खरात सर, अंगणवाडी ताई कार्यकर्त्या अग्नी अण्णाभाऊ खळगे यांनी अतिशय मेहनत करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळवून देण्याचे काम केलेला आहे..

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य समता ज्योत रॅली उत्साहात संपन्न

**पोलीस प्रशासन च्या पुढाकाराने द्वितीय वर्षीय समता ज्योत रॅली यशस्वी**

माजलगाव (प्रतिनिधी):- माजलगाव येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती च्या पूर्वसंध्येला शिव-फुले-शाहू-आंबेडकरी अनुयायी व पोलीस प्रशासन माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य समता रॅली चे आयोजन करण्यात आले होते ही समता रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पोहचली व तेथे ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन जुना मोंढा रोड या मार्गाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक



भीम नगर माजलगाव येथे ठीक १२ वाजता बुद्ध वंदनेने रॅलीची सांगता झाली व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धकृती स्मारकास पुष्पहार अर्पण करून उपजिल्हाधिकारी मा.गौरव इंगोले माजलगाव शहर पोलिस निरीक्षक मा.राहुल सूर्यतळ, माजलगाव ग्रामीण पोलीस अधीक्षक मा.बालक कोळी यांनी व तमाम जनसमुदायांनी अभिवादन केले. या समता ज्योत रॅली मध्ये उपजिल्हाधिकारी मा.गौरव इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती माजलगाव शहर पोलीस अधीक्षक मा.राहुल सूर्यतळ माजलगाव ग्रामीण पोलीस अधीक्षक मा.बालक कोळी व सर्व पोलीस प्रशासन तसेच माजलगाव येथील सर्वपक्ष संघटनेचे पदाधिकारी व्यापारी व शिव-शाहू-फुले-आंबेडकरी युवकांची युवतींची व विशेष महिलांची उपस्थिती होती. हि रॅली यशस्वी करण्यासाठी माजलगाव शहरातील शिव-फुले-शाहू-आंबेडकरी अनुयायी यांनी परिश्रम घेतले.

## महावीर-भगवान स्वामी चा जन्मकल्याण उत्सव निमित्त धार्मिक कार्यक्रम व अन्नदान

बीड (प्रतिनिधी):- बीड शहरातील फुलाईनगर, कृष्ण मंदिर जवळ पवनपुत्र निवास येथे समाजसेविका सीमा ओस्तवाल, मनोज ओस्तवाल, वीरेंद्र ओस्तवाल यांनी महावीर भगवान स्वामी चा जन्मकल्याण उत्सव निमित्त रामायणतील सुंदरकांड चे पारायण व महाप्रसादाचे आयोजन केले होते. गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या परिवाराच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून बीड शहरातील विविध छोट्या मोठ्या वस्त्यावरील, विविध जाती धर्मातील गोरगरीब गरजूंसाठी अन्नदानाचा उपक्रम राबवण्यात



आला. भगवान महावीर जन्मकल्याण उत्सवात विविध कार्यक्रम घेण्यात आले.बीड शहरातील समाजसेविका गुरु आनंद महिला प्रतिष्ठानचे अध्यक्ष सौ.सीमा ओस्तवाल यांच्याकडून जैन समाजाचे २४ वे तीर्थकार भगवान महावीर स्वामीचा जन्मकल्याण साजरा करण्यात आला. बीड शहरातील वेगवेगळ्या भागात जाऊन तिथल्या गोरगरीब लोकांना एक वेळचं जेवण देऊन भगवान महावीर स्वामी चा जन्म कल्याण साजरा करण्यात आला. यावेळी पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मोद्दीराज साहेब, पत्रकार आननाद खान, विजय पोकळे, जिव्हाळा बेघर चे राजू वंजारे, अभिजीत वैद्य,छाया सरोदे, सुजाता सावंत, सविता जैन, ॲड. अश्विनी शिंदे, सुरेखा झिंगे अनिता वाघमारे, गणेश झिंगे, यांच्यासह असंख्य गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या परिवारातील सदस्यांची उपस्थिती होती.

## जिल्हास्तरीय लॅक्रोस टीमची पुणे येथे होणार्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

बीड (प्रतिनिधी):- नुकत्याच बीड जिल्हा लेक्रॉस असोसिएशनच्या वतीने जिल्हास्तरीय निवड चाचणी द.बा. घुमरे माध्यमिक विद्यालय बीड येथे घेण्यात आली. या चाचणीमध्ये निवड झालेल्या संघ पुणे येथे होणार्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.

जिल्हा संघामध्ये निवड झालेल्या खेळाडू जुनिअर गट मुली तनुजा हाडुळे, सृष्टी जाधव, गौरी नागपुरे, श्रावणी मुळे, सुहानी शिंदे, अदिती शिंदे, सिद्धी जाधव, अक्षता बंड, ज्ञानेश्वरी नागरगोजे,जुनिअर गट मुलांमध्ये अमोल ढवळे, संकेत वायकर , आर्यन ढवळे, कृष्णा मेहेत्रे, ओम जाधव, युवराज वाघ, पृथ्वीराज गिरी सीनियर गट मुले रोहित ढवळे ,दिनेश ढाकणे, संदीप सानप ,संतोष सानप, आशिष कोठुळे, अमोल ढवळे, रवी जाधव, अतुल लोंढे, सुभाष भंडाने या खेळाडूंची लेकरूस बीड जिल्हा संघात निवड झाली आहे. वरील साडू पुणे येथे होणार्या



राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, पदाधिकारी अनिकेत काळे, क्रीडा मार्गदर्शक राठोड सर, जितू आराक सर, बीड जिल्हा लेक्रॉस असोसिएशन अध्यक्ष रामदास गिरी, सचिव विशाल गिरी , माऊली डोळे, रोहित ढवळे, अन्य प्रशिक्षक व पालकनी निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन केले व राज्यस्तरीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती रुग्णांना फळ वाटप करून केली साजरी



किल्लेधारूर (प्रतिनिधी) किल्लेधारूर ग्रामीण रुग्णालय येथे विश्वभूषण परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती रुग्णांना फळ वाटप करून साजरी करण्यात आली. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

याप्रसंगी रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी नितीन परदेशी डॉ.परवेज शेख भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक भीमरावजी सिरसट तालुका शाखा अध्यक्ष विष्णू तूपसागर सरचिटणीस कैलास साळवे संघटक सनी गायसमुद्रे भीम शाहीर कांबळे तसेच रुग्णालयातील स्टाफ मोठ्या संख्येने उपस्थित होता.

*आनंदऋषीजी हॉस्पिटल मध्ये रविवार दि २० एप्रिल रोजी ११ ते २ आस्थीरोग तपासणी मार्च*

## मनके व सांधे बदली शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन

बीड (प्रतिनिधी):- राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहु बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे रविवार दि २० एप्रिल रोजी ११ ते २ या वेळेत आस्थीरोग तपासणी तसेच मनके व सांधे बदली, गुडघे दुखी, पाठ दुखी, कंबर दुखी तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना कमीत कमी पैशात सेवा उपलब्ध व्हावी या उदात्त हेतुने शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी अस्थिरोग असणार्या रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीडच्यावतीने करण्यात आले आहे.

या शिबीरात संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण, संपूर्ण खुबा प्रत्यारोपण ६५ हजार रुपये व पुढील खर्चात गुणवत्तापूर्ण इन्प्लांटसह, आर्थोस्कोपी निदान करण्यात येणार आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केल्या जातील. शिबीरात आस्थिरोग सर्जन डॉ. रोहन धोत्रे व तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी व उपचार करणार आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णसेवेमध्ये राज्यामध्ये सुप्रसिध्द आहे. आनंदऋषीजी रुग्णालयात १ हजार ३०० पेक्षा जास्त कर्मचारी, विविध फिल्डमध्ये २५० पेक्षा अधिक डॉक्टर सेवा करत आहेत. आज पर्यंत हजारो अस्थिरोग असणार्या रुग्णांवर उपचार करुन असंख्य रुग्ण या आजारापासून मुक्त झालेले आहेत. आस्थीरोग शिबीरात तपासणी करण्यासाठी नोंदणी फीस केवळ १०० रुपये ठेवण्यात आलेली आहे. नोंदणीसाठी मो. ८२६२००९०९१ यावर संपर्क साधावा. वेळे अभावी नोंदणी करु न शकलेल्या रुग्णांची देखील तपासणी करण्यात येणार आहे.

रविवार दि २० एप्रिल रोजी ११ ते २ या वेळेत, अहमदनगर येथील तज्ञ डॉ.रोहन धोत्रे व त्यांचे सहकारी डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. संत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या २० वर्षापासून हॉस्पिटल कार्यरत आहे. तरी बीड शहरातील व पंचक्रोषीतील आस्त्रीरोग रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन बीडचे विश्वस्त व समस्त जैन समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

# परळीत तहसीलदार व महसूल प्रशासनाची जन्मदाखले देतांना प्रचंड बोगसगिरी-सोमैय्या

परळी वै (प्रतिनिधी):- पुरावे नसताना बोगसगिरी करून मोठ्या प्रमाणावर जन्म दाखले देण्यात आल्याचे मोठ्या प्रमाणावर प्रकार बीड जिल्ह्यातील तीन ठिकाणी झालेले आहेत. परळीतील महसूल प्रशासन यात आघाडीवर असल्याचे भाजपा नेते किरीट सोमैय्या यांनी म्हटले आहे. किरीट सोमैय्यांनी परळी पोलीस ठाण्यात तब्बल तीन तास ठिय्या मांडून त्यांनी तहसीलदार, नायब तहसीलदार, नगरपालिका प्रशासन आदी सर्व संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. याप्रकरणी दोन- तीन दिवसात परळीत गुन्हा दाखल करण्यात येईल असे आश्वासन इथल्या पोलीस अधिकाऱ्यांनी आपल्याला दिले असल्याचे किरीट सोमैय्या यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

भाजप नेते किरीट सोमैय्या हे आज (दि.१५) सकाळीच परळी दाखल झाले. परळीत जन्म दाखले देताना मोठ्या प्रमाणावर घोटाळे व बोगसगिरी झालेले असुन ४०-५० वर्षानंतर अनेकांना कुठलेही निकष न पाहता, कोणत्याही सुनावण्या न करता, पुरेसे पुरावे नसताना बिनधास्तपणे जन्म दाखले देण्यात आले अशी ६०-७० उदाहरणे सप्रमाण त्यांनी महसूल, नगरपालिका व पोलीस प्रशासनाला दाखवली. परळी वैजनाथ येथून जवळपास



दाखल झालेल्या १३८९ अर्जांपैकी केवळ ११ अर्ज हे फेटाळल्याचे दिसते. मात्र जे १३७८ अर्ज मंजूर करून जन्म दाखले जारी करण्यात आले त्यात पुरेसे पुरावे नसल्याचे दिसते. तसेच नगरपालिकचे प्रतिनिधी सुनावणीच्या वेळी हजर नसतानाही सुनावणीला हजर असल्याचे बहुसंख्य प्रकरणात नमूद करण्यात आलेले आहे. याबाबत परळीच्या तहसीलदारांनाही समाधानकारक अशा प्रकारचा खुलासा करता आलेला नाही. त्यामुळे बिनधास्तपणाने कोणतेही निकष न पाहता, पुरेसे पुरावे उपलब्ध नसतानाही बोगसगिरी करून तहसीलदार, नायबतहसीलदार यांनी हे जन्म दाखले जारी केलेले आहेत हे स्पष्ट होते. या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. यासाठी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची आपली मागणी होती. त्यासाठी आपण पोलीस प्रशासनाला पुराव्यासह गुन्हा नोंदविण्याची मागणी केली आहे. दोन दिवसात याची चौकशी करून निश्चित गुन्हा दाखल होईल असे आश्वासन आपल्याला परळीच्या पोलिस अधिकाऱ्यांनी दिले असल्याचे किरीट सोमैय्या यांनी सांगितले. दरम्यान परळीत मोठ्या प्रमाणावर बोगसगिरी करून जन्म दाखले देण्यात आलेले आहेत. या पाठीमागे बोगसगिरी करणाऱ्या प्रत्येक संबंधिताला जबाबदार धरून याची सखोल चौकशी झाली पाहिजे व त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. यामध्ये या सर्व बोगसगिरीच्या पाठीमागे जे अधिकारी आहेत किंवा त्यांचे कोणी राजकीय गॉडफादर असतील त्यांच्यावरही कारवाई झाली पाहिजे अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# पाण्याची समस्या दूर!

## धारूर तालुक्यातील आईचा तांड्यावर युवा ग्राम विकास मंडळाची यशस्वी योजना

किल्ले धारूर (प्रतिनिधी):- गेल्या ४० वर्षांपासून धारूर तालुक्यातील आईचा तांडा येथे पिण्याच्या पाण्याची गंभीर अडचण होती. येथील नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागला, ज्यामुळे वृद्ध आणि मुलांना दिवसाचा बराच काळ पाण्यासाठी जावे लागे. परंतु, युवा ग्राम विकास मंडळाने आता या समस्या समाधानात यश मिळवले आहे. अजीम प्रेमजी फाउंडेशन यांच्या सहकार्याने ही योजना पूर्ण करण्यात आली. युवा ग्राम विकास मंडळाने पिण्याच्या पाण्याच्या योजनेचा दुसरा टप्पा राबविला असून यामध्ये ५० फूट विहीर, १६०० मीटर पाईपलाईन, २ पिण्याच्या पाण्याच्या टाक्या, २ जनावरांचे हौद आणि जुन्या हौदाची दुरुस्ती यांचा समावेश आहे. पाणी पुरवठा




समिती स्थापन करून, त्यांच्यावर प्रशिक्षणे प्रदान करून, त्यांची पिण्याच्या पाण्याबद्दल क्षमता वाढवली गेली आहे. पाण्याच्या या सुविधेमुळे येथील नागरिकांनी आनंद व्यक्त करून उत्सव साजरा केला. पिंपरवाडा ग्राम पंचायतच्या सरपंच, सौ वर्षा तिडके यांनी युवा ग्राम विकास मंडळाचे आभार मानले आणि त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. पाणी पुरवठा समितीचे सदस्य श्री गोपीनाथ आडे यांनी सांगितले की, प्रत्येक कुटुंबाकडून मासिक वर्गणी स्वरूपात रक्कम घेतली जाणार आहे, ज्यायोगे योजनेच्या देखभाल आणि दुरुस्तीची पूर्ण जबाबदारी समितीवर असेल. युवा ग्राम विकास मंडळाच्या या कार्यामुळे गावामध्ये पाण्याची समस्या खूप चांगल्या प्रकारे सोडवली गेली आहे. ४० वर्षांच्या संघर्षानंतर पान २ वर...

# विभागीय आयुक्तानी गेवराईकरांच्या समस्या ऐकल्या

गेवराई (प्रतिनिधी):- गेवराई शहरातील नगर परिषद यांच्या कडून काल दिनांक १५/४/२०२४ रोजी दुपारी नगर परिषद कार्यलय या ठिकाणी वेळ दुपारी ४ ते ७ वाजे पर्यंत हा कार्यक्रम राबविण्यात आला या बाबत आधिक माहीत आशी आहे की, गेवराई शहरातील सम्पूर्ण समस्या काय आहेत हे माहिती



होण्यासाठी काल व्हीसीद्वारे गेवराई नगर परिषद या ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आला, या मध्ये संभाजीनगरचे विभागीय उपायुक्त दिलीप गावडे ( भा . प्र. से ) हे स्वतः व्हीशी द्वारे या कार्यक्रमांमध्ये लाईव्ह होते, या मध्ये गेवराई शहरातील काय समस्या आहेत, हे संभाजीनगरचे उपायुक्त स्वतः व्हीशी द्वारे आकत होते, या कार्यक्रम मध्ये गेवराई शहरातील ६९ नागरिक उपस्थित होते, या वेळी ८ समस्याचे निवेदन मुख्याधिकारी नगरपरिषद विक्रम मांडुरके यांना देण्यात आले आहेत. गेवराई शहरातून या कार्यक्रम मध्ये आठ निवेदन आली आहेत, या मध्ये ४ निवेदन हे अतिक्रमण विषय आहेत, ३ वैयक्तिक आहेत, १ स्वच्छतेबाबत आहे, या सर्व निवेदनावर लवकरात लवकर तोडगा काढण्यात येईल, योग्य निर्णय घेण्यात येईल.

# सांस्कृतिक पुनरुज्जीवनासाठी साहित्यिकांचे बीडमध्ये मराठी भाषा संवर्धन मंत्र्यांना साकडे

## साहित्यिक डॉ.दिपाताई क्षीरसागर यांचे ना.उदय सामंत यांना निवेदन

बीड (प्रतिनिधी):- जिल्ह्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि त्याचे जतन व विकास करण्यासाठी बीडच्या साहित्यिक डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी उद्योग व मराठी भाषा संवर्धन मंत्री उदय सामंत यांना निवेदन सादर केले. या निवेदनात बीड शहराच्या ऐतिहासिक, आध्यात्मिक आणि साहित्यिक परंपरेला चालना देणाऱ्या अनेक योजनांचा समावेश आहे.

डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी बीड येथे उद्योग व मराठी भाषा संवर्धन मंत्री उदय सामंत यांना दिलेल्या निवेदनात जिल्ह्यातील सांस्कृतिक, शैक्षणिक विकासासाठी विविध मागण्या मांडल्या आहेत. निवेदनात



पुढे म्हटले आहे की, बीडमधील पाटांगण घराण्याकडे असलेल्या दुर्मिळ पोथ्यांचे स्कॅनिंग व डिजिटायझेशन करून त्या सुरक्षित ठेवण्यासाठी स्वतंत्र इमारतीत ग्रंथालय उभारण्यात यावे. अंबाजोगाई येथे मराठी भाषा विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करा. बीड परिसरातील विविध अध्यात्मिक परंपरांचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र अध्यासन केंद्र उभारावे. बीड, माजलगाव, धारूर, पाटोदा, अंबाजोगाई, गेवराई या परिसरातील मठ व मंदिरांच्या परंपरांचा अभ्यास करण्यासाठी अभ्यास गट स्थापनेची गरज व्यक्त करण्यात आली आहे. पाटांगण मठातील ललित कीर्तन परंपरेचा आणि इतर ठिकाणच्या सांस्कृतिक वारशाचा अभ्यास महत्त्वाचा ठरेल. रामतीर्थ येथील गिरिधर स्वामी, राघवस्वामी व देवस्वामी यांच्या समाधीस्थळांचा जिर्णोद्धार करून तेथे सुशोभीकरण करण्यात यावे. तसेच, संत ज्ञानेश्वर यांचे आजोबा गोविंदपंत यांच्या समाधीस्थळाचा जिर्णोद्धार करणेही आवश्यक आहे. बीडचे शासकीय ग्रंथालय अधिक सुसज्ज आणि आधुनिक करण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली आहे. जिल्ह्यात 'पुस्तकांचे गाव' ही योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात यावी. यावर्षीचे मराठी भाषा संमेलन बीड येथे पान २ वर...

# बदलत्या जीवनशैलीमुळे किशोरवयीन मुलींमध्ये पीसीओएस विकार वेगाने वाढतोय- डॉ. पूजा माने

बीड (प्रतिनिधी):- जागतिक आरोग्य दिनानिमित्त बीड शहरातील आदित्य शिक्षण संस्थेत पीसीओएस आणि पीसीओडीच्या पॅथोफिजियोलॉजी या विषयावर निरोगी सुरुवात, आशादायक भविष्य या संदर्भात डॉ. पूजा माने-जाधव, (एमबीबीएस, डीजीओ) यांचे अतिथी व्याख्यान संपन्न झाले. त्यांनी बदलत्या जीवनशैलीमुळे किशोरवयीन मुलींमध्ये पीसीओएस विकार वेगाने वाढत असल्याचे कारण सांगितले. यावेळी आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला आदित्य शिक्षण संस्थेतील आयुर्वेद, नर्सिंग, दंत, कृषी, कृषी अभियांत्रिकी अन्न तंत्र जैवतंत्र, फार्मसी फिजिओथेरपी महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उदघाटकन आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.



आदित्य शिक्षण संस्थेत जागतिक आरोग्य दिनानिमित्त पीसीओएस आणि पीसीओडीच्या पॅथोफिजियोलॉजी विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

दर्जेदार शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या आरोग्याचीही काळजी आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा पान २ वर...

# इडीच्या विरोधात काँग्रेसची जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने



बीड (प्रतिनिधी):- नॅशनल हेरॉल्ड प्रकरणात काँग्रेस पक्षाच्या नेत्या मा. सोनियाजी गांधी व राहुलजी गांधी यांच्या विरोधात चुकीचे चार्जशीट दाखल करत जाणीवपुर्वक गांधी व काँग्रेस परिवाराच्या विरोधात ई डी ला पुढे करुन भारतीय जनता पार्टीचे हे जुलमी सरकार षडयंत्र रचत असुन या विरोधात आज जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात बीड जिल्हाधिकरी कार्यालयासमोर निदर्शने करत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, प्रदेश सरचिटणीस अमर खानापुरे, गणेश बजगुडे, श्रीनिवास बेदरे, बाळासाहेब ठोंबरे, गणेश राउत, परवेज कुरेशी, महेश बेदरे, मोहसीन शेख, आकाश मस्के, आशिष सोनवणे, सफदार देशमुख, विष्णु मस्के, अमोल पाठक, रामधन जमाले, हनुमान घोडके, ड. विलास मस्के, नितीन जयभय, गणेश जवकर, कादर बाबामिया, शेख जहीर, शेख जमील, शेख खमरोद्दीन आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# आंधळे यांच्या शुभहस्ते एनएमएमएस शिष्यवृत्तीस पात्र झालेल्या १४ विद्यार्थ्यांचा सत्कार

वडवणी (प्रतिनिधी):- वडवणी येथील, महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे १४ विद्यार्थी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील इयत्ता-८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या एनएमएमएस २०२४-२५ शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करून पात्र झाले आहेत त्यांचा पालकासह विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष मा.श्री.संजयभाऊ आंधळे यांच्या शुभहस्ते गुणगौरव करण्यासाठी सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४



व्या जयंतीचे औचित्य साधून सोमवार दि.१४ एप्रिल २०२५ रोजी विद्यालयांमध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते मा.संजयभाऊ आंधळे तसेच विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी.,उपप्राचार्य मस्के ए.आर.,पर्यवेक्षक धाईतिडक सर,अर्थ विभाग प्रमुख श्री.डोईफोडे सर,प्रमुख वक्त्या म्हणून श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम,श्री.कुलकर्णी सर अदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. एनएमएमएस शिष्यवृत्तीस पात्र झालेल्या कु.रेडेकर प्रांजल,कु.बोंगार्डे वेदिका,कु. दिवटे संस्कृती,चि.बारटक्के सुमित,चि. गुरसाळी

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक संजय रघुनाथ हांगे यांनी ओम ऑफसेट, क्रांतीनगर, तहसीलच्या मागे, डी.पी.रोड बीड, ता.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक साप्ताहिक अक्षर वार्ता कार्यालय,क्रांतीनगर, तहसील कार्यालयाच्या मागे, डी.पी.रोड, बीड ता.जि.बीड पिन -४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले आहे. संपादक : संजय रघुनाथ हांगे,मो.९७६६२६८४१५ Email : aksharwartanews@gmail.com

The Newspaper Printed, Published and Owend by SANJAY RAGHUNATH HANGE and Printed at OM OFFSET, Kranti Nagar, Behind Tahasil Office, D.P. Road, Tq, Dist. Beed 431122 (Maharashtra) and published at office Of DALY SAPTAHIK AKSHAR VARTA , Kranti Nagar, Behind Tahasil Office, D.P. Road, Tq, Dist. Beed 431122 (Maharashtra) Editor : SANJAY RAGHUNATH HANGE Mo : 9766268415